| | |
|---|---|
| सं.फौ.खटला क्र:२१९३/२०२५<br>शिवदिप दुधाले वि लिलाज ब्युटीपार्लर<br>निशाणी क्र.२३<br><br>**<u>आरोपीचा ३१३ सी.आर.पी.सी प्रमाणे खालील जबाब.</u>**<br>आरोपीचे नांव – **लिलाज ब्युटी पार्लर,**<br>वय– ४० वर्ष, धंदा– व्यवसाय,<br>राहणार–लक्ष्मीनारायण, कॉम्प्लेक्स, मोची गल्ली, तोफखाना, अहिल्यानगर. | |
| प्रश्न १: | फिर्यादीतर्फे घेण्यात आलेला पूरावा तूम्ही ऐकला का व तो तुम्हाला समजला का? |
| उत्तर : | होय. |
| प्रश्न २: | फिर्यादी साक्षीदार क्र.१ शिवदीप किशोर दुधाले यांचे पुराव्यात असे आले आहे की, फिर्यादी व तुमचेमध्ये मैत्रीचे संबंध आहेत. तुम्हाला आर्थिक अडचणीमुळे तुमचे मालकीचे तोफखाना भागातील सिटी सर्व्हे नं.५६७ वर बांधलेले लक्ष्मीनारायण कॉम्प्लेक्स मधील तळमजल्यावरील दुकान गाळा क्र.१ चे क्षेत्र १६.९० चौ.मी. बिल्टअप मिळकत विक्रीस काढली होती व त्याबाबत तुम्ही फिर्यादीस सांगितले होते. तसेच तुम्ही त्यांना आग्रह केल्याने त्यांनी दुकान गाळा विकत घेण्यास तयार केले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खरे नाही. |

| | |
|---|---|
| | |
| प्रश्न ३: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुम्ही व फिर्यादीमध्ये दुकान गाळयाची बाजारभावाप्रमाणे रूपये १३,००,०००/— सौदा ठरला. दिनांक १०.०६.२०२२रोजी त्यांनी तुम्हाला ३,००,०००/— रूपये रोख दिले. त्याप्रमाणे तुम्ही त्यांना दिनांक २१.०६.२०२२ रोजी संपुर्ण रकमेचे साठेखत नोटरी पब्लिक यांचेकडे लिहुन व नोंदवुन दिले. सदर दिवशी त्यांनी तुम्हाला १०,००,०००/— रूपये अदा केले. असे एकुण १३,००,०००/— रूपये रोख स्वरूपात अदा केले. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न ४: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, तुमच्या अग्रहास्तव सदर रक्कम त्यांनी तुम्हाला रोख स्वरूपात दिली. सदर साठेखत झाल्यानंतर १० महिन्याचे मुदतीमध्ये तुम्ही सदर मिळकतीचे खरेदीखत मे. दुयyम निबंधक अहमदनगर यांचे कार्यालयात लिहुन नोंदवण्याचे कबुल करून त्यांचे लाभात साठेखत करून दिले. वर नमुद मुदतीत त्यांनी तुम्हाला खरेदीखत लिहुन नोंदवुन मागितले असता तुम्ही खरेदीखत नोंदविण्यास अडचणी आहे असे कारण देवुन एक महिन्याची मुदत वाढविली. याबाबत तुम्हास काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न ५: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यानंतर त्यांनी |

| | |
|---|---|
| | आरोपीस वेळोवेळी खरेदीखत लिहुन नोंदवुन मागितले परंतु त्यांनी करून दिले नाही. त्यांनी तगादा केला असता तुम्ही म्हणाला की, ‘‘माझा ब्युटीपार्लरचा व्यवसाय सदर जागेत चालु केला आहे व त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे, म्हणुन मी सदर जागा विकु इच्छित नाही. त्यामुळे तुम्हास खरेदीखत कयन देणे शक्य नाही. तुमचेकडुन घेतलेली रक्कम रूपये १३,००,०००/— पैकी सध्या रक्कम रूपये ८,००,०००/— चा चेक देतो व उर्वरीत रक्कम रूपये ५,००,०००/— सहा महिन्यात देतो’’. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न६: | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्याप्रमाणे तुम्ही त्यांना दिनांक २७.१२.२०२४ रोजीचा रक्कम रूपये ८,००,०००/— चा धनादेश क्र.१८३६९४ पंजाब नॅशनल बॅंकेचा धनादेश दिला. याबाबत तुम्हास काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर: | हे खरे नाही. |
| प्रश्न:७ | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदर धनादेश त्यांनी त्यांचे खाते असलेल्या अहमदनगर मर्चंटस को ऑप बॅंक लि., शाखा कापडबाजार, अहिल्यानगर येथे वटविण्यासाठी भरला असता सदर धनादेश दिनांक ३०.१२.२०२४ रोजी आदर रिझन या शे—यासह अनादरीत झाल्याने मेमोसह परत न वटता परत आला. याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |

| | |
|---|---|
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न:८ | सदर साक्षीदाराच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, सदर चेक न वटल्यामुळे त्यांनी त्यांच्या वकीलांमार्फत तुम्हाला दिनांक ०९/०१/२०२५ रोजी नोटीस पाठवुन चेकच्या रक्कमेची मागणी केली, सदर नोटीस तुम्हाला दिनांक १३/०१/२०२५ रोजी प्राप्त झाली, तरी देखील तुम्ही मुदतीत पैसे परत दिले नाहीत करीता फिर्यादीने तुमचे विरुध्द सदरची केस निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दाखल केली, याबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे? |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न ९: | फिर्यादी शिवदिप किशोर दुधाले हे तुमच्या विरूध्द का सांगतात? |
| उत्तर : | माहित नाही. |
| प्रश्न १०: | नि.क्र.१६ धनादेशाबााबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न ११: | नि.क्र.१७ वरील रिटर्न मेमोबदद्ल तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १२: | नि.क्र.१८ वरील नोटीस स्थळप्रतबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १३: | नि.क्र.१९ वरील आर.एल. रिसीटबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १४: | नि.क्र.२० वरील पोहोच पावतीबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |
| प्रश्न १५: | नि.क्र.२१ वरील साठेखताबाबत तुम्हाला काय सांगावयाचे आहे. |
| उत्तर : | हे खरे नाही. |

| | |
|---|---|
| प्रश्न : | तुम्हाला स्वत:ला शपथेवर तपासायचे आहे काय किंवा अन्य साक्षीदार तपासायचे आहेत काय? |
| उत्तर : अ | नाही |
| प्रश्न : | तुम्हाला बचावाखातर काही कागदपत्र दाखल करावयाचे आहेत काय? |
| उत्तरफिर्यादी | नाही |
| प्रश्न : | प्रकरणबाबत आणखी काही सांगावयाचे आहे का? |
| उत्तर : | खोटे प्रकरण आहे. |

समक्ष

सही/—

..............................

**(माधुरी रा. खनवे)**

आरोपीची सही/आंगठा

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.०४, अहदमनगर

<u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, आरोपीचा उपरोक्त जबाब माझ्या समक्ष नोंदविण्यात आला असून तो त्याने सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

सही/—

**(माधुरी रा. खनवे)**

दिनांक : १८/११/२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र.०४, अहदमनगर